# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक २४७-२२** **दिनांक १२/०८/२०२**

## स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त भरोसा सेलच्या माध्यमातून मिरा-भाईंदर मधील शाळा व महाविद्यालयातील विदयार्थ्यांना "कायदेविषयक शिक्षण" देण्याचा अभिनव उपक्रम.

भरोसा सेल (गुन्हे शाखा), भाईंदर पश्चिम शाखेच्या स.पो.नि. तेजश्री शिंदे व भरोसा सेलच्या समुपदेशन समितीमध्ये कार्यरत समुपदेशकांच्या मार्फतीने मिरा-भाईंदर मधील सर्व शाळांमध्ये जनजागृती अभियान अंतर्गत शाळा व महाविद्यालयातील विदयार्थ्यांना महिला व बालकांविषयक कायदे, त्यांची सुरक्षितता, सायबर गुन्हे, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम इ. बाबत कायदेशीर माहिती देण्याच्या अभियानाला आज दि. १२/०८/२०२२ रोजी श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), अति. कार्य. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे) व श्री. अमोल मांडवे सहाय्यक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात करण्यात आली आहे.

सदर अभियानाअंतर्गत स.पो.नि. तेजश्री शिंदे व भरोसा सेल समुपदेशन समितीमधील समुपदेशक श्रीमती आशा सॅलियन, प्रयास फाउंडेशनच्या संस्थापिका श्रीमती जेसी सिस्टर, माजी मुख्याध्यापिका होली क्रॉस कॉनव्हेन्ट हायस्कूल, मिरारोड यांच्या मदतीने भाईंदर पश्चिम येथील १) अवर लेडी ऑफ नाझरत हायस्कूल, २) निर्मला निकेतन हायस्कूल, ३) जे.एच. पोद्दार हायस्कूल, ४) सेंट झेवियर्स हायस्कूल, ५) मिरा-भाईंदर महानगरपालिका परिषद शाळा अशा एकुण ५ शाळांना दिनांक १२/०८/२०२२ रोजी भेट देवून तेथील एकुण १२०० विदयार्थ्यांना **"कायदेविषयक शिक्षण"** या अभियानाअंतर्गत प्रबोधन करण्यात आले.

सदर जनजागृती अभियानाअंतर्गत मिरा-भाईंदर मधील सर्व शाळा व महाविद्यालयांतील मुलांकरिता विशेष मोहिम राबवून त्यांना महिला व बालकांविषयीच्या कायदयांबाबत, त्यांच्या सुरक्षिततेबाबत, सायबर गुन्हे, अंमली पदार्थांचे दुष्परिणाम माहिती देवून कायदयाचे शिक्षण देण्याचा अभिनव उपक्रम **"भरोसा सेल"**च्या माध्यमातून राबवण्यात येणार आहे. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त जास्तीत जास्त विदयार्थ्यांना **"कायदेविषयक शिक्षण"** देण्याचा मानस भरोसा सेलच्या प्रमुख स.पो.नि. तेजश्री शिंदे यांनी व्यक्त केला आहे.

----oooo----



